**`प्रकरण- 2**

# 1857 चा राष्ट्रीय उठाव

**प्रस्तावना :**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी जी एक व्यापारी कंपनी म्हणून भारतामध्ये आली. 1608 साली ब्रिटिशांनी आपली पहिली व्यापारी वखार सुरत येथे निर्माण केली. यानंतर कंपनीने मच्छलीपटनम्, पद्दुचरी, बंगाल, कर्नाटक, अवध, पंजाब व महाराष्ट्र अशा भारतातील इतर सत्ताधीशांशी व्यापारी करार केले. यामुळे प्रसंगी सैन्य बळाचा वापर करून भारतातील बरीच संस्थाने खालसा केली व ब्रिटिश साम्राज्याची निर्मिती केली. 1757 ची प्लासीची लढाई व 1764 च्या बक्सारच्या युद्धामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतातील काही भूभागावर म्हणजेच बंगाल, बिहार, ओरिसा या भागांवरील राज्य करण्यासाठीचे निजामी व दिवाणी अधिकार मिळाले. ब्रिटिश पार्लमेंटने रेग्युलेटिंग ॲक्ट व चार्टर ॲक्टद्वारे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीवर वचक व नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. 1757 ते 1857 या शंभर वर्षाच्या कालखंडामध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील बंगाल, पंजाब, उदयपुर, संबळपुर, झाशी, काल्पी व मराठ्यांच्या संस्थानावर स्वतःचा धाक जमवत ही संस्थाने खालसा केली. हजारो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनामध्ये ब्रिटिशांनी हस्तक्षेप सुरू केला. समान कायदा, समान शिक्षण पद्धती या सर्व गोष्टींमुळे देखील ब्रिटिश कंपनीच्या विरोधी भारतीय समाजात विरोधी वातावरण निर्माण झाले.

1857 चा उठाव हा भारताच्या इतिहासावरच नव्हे तर जागतिक इतिहासावर परिणाम करणारी घटना होय. राष्ट्रभावनेचा विचार करता एकत्रितरित्या भारतीयांनी ब्रिटिशांविरुद्ध लढलेला 1857 चा उठाव हा भारतातील पहिला राष्ट्रीय उठाव होय. 1857 च्या उठावामुळे भारतीयांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनामध्ये बरेच स्थित्यंतर व बदल घडून आले.

1757 ते 1857 या कंपनी सरकारच्या कालखंडामध्ये ब्रिटिशांच्या विरोधी बंडाचे वातावरण तयार झाले. यामध्ये संथाळ, भिल्ल, रामोशी, कोळी यांची अनेक बंडे झाली होती. याबरोबर वेल्लोरच्या सैनिकांचा उठाव व आसाम येथील तोफखाना दलाने केलेला उठाव असे लष्करी उठाव ही आपल्याला पाहायला मिळतात.

**1857 च्या राष्ट्रीय उठावाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.**

**1. राजकीय कारणे:**

1857 च्या उठावाचे हे एक प्रमुख कारण होय. 1848 मध्ये लॉर्ड डलहौसी हा ब्रिटिश भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. संपूर्ण भारतातील प्रदेश व संस्थाने त्याला कंपनीच्या नेतृत्वाखाली आणावयाची होती. यासाठी दत्तक वारस नामंजूर, राजकीय व आर्थिक अराजकता अशी कारणे दाखवून त्यांनी भारतीय संस्थाने खालसा केल्याचे दिसून येते.

**अ) इंग्रजांचे साम्राज्यवादी धोरण:**

ईस्ट इंडिया कंपनीने 1757 ते 1857 या शंभर वर्षाच्या कालखंडामध्ये भारतातील विविध संस्थाने खालसा केली. भारत ही ब्रिटिशांची प्रमुख वसाहत होती, ज्यातून ब्रिटिशांना आर्थिक लाभ होत होता. ब्रिटिशांना भारतावर राज्य करण्याची सुवर्णसंधी लाभल्याने त्या आर्थिक लाभामध्ये आणखीन भर झाली. कंपनीने वसाहतवाद व साम्राज्यवादी धोरणाने भारतात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार केला.

**ब) लॉर्ड डलहौसीचे साम्राज्यवादी व आक्रमक धोरण:**

Dr. S.P. Kattimani - History of Modern India

लॉर्ड डलहौसीच्या साम्राज्यवादी धोरणामुळे कंपनीने ब्रह्मदेशाशी युद्ध करून तो ब्रिटिश साम्राज्यात जोडला. सिक्कीमचा प्रदेश जोडला. लॉर्ड डलहौसीच्या साम्राज्यवादी धोरणामुळे कंपनीचा भारतातील साम्राज्य विस्तार झाला. त्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरोधी वातावरण निर्माण झाले.

**ड) तैनाती फौज:**

तैनाती फौजेच्या नियमनासाठीचा खर्च दिला नसल्याचे कारण दाखवून निजामाच्या ताब्यातील बराच भाग कंपनीने बळकावला. अवधचे राज्यही हस्तगत केले. लॉर्ड वेलस्लीच्या काळात तैनाती फौजेची पद्धत ब्रिटिशांनी अंमलात आणली. ब्रिटिशांनी भारतीय संस्थानिकांना तैनाती फौजेची पद्धत स्वीकारण्यास भाग पाडले. तैनाती फौजेचा स्वीकार केलेल्या भारतीय संस्थानिकांना खूप मोठी रक्कम त्या सैनेचा खर्च म्हणून ब्रिटिशांना द्यावा लागे. भारतीय संस्थानिकांना स्वतःचे सैन्य यामुळे ठेवता येईना. तैनाती फौजेतील सैन्य हे ब्रिटिशांशी निष्ठा ठेवत असे. तैनाती फौजेचा स्वीकार केल्यामुळे अनेक भारतीय संस्थानिकांना त्यांची स्वायत्तता व स्वातंत्र्य गमावून बसावे लागले. त्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधी तैनाती फौज स्वीकारलेल्या भारतीय संस्थानिकांमध्ये व सैनिकांमध्ये असंतोष निर्माण झाला.

**क) दत्तक वारस नामंजूर:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय संस्थानिकांना दत्तक वारस घेण्याबाबत नवीन नियमावली तयार केली. याचा आधार घेऊन लॉर्ड डलहौसीने सातारा, संबळपुर, नागपूर, झाशी इत्यादी संस्थाने ब्रिटिश साम्राज्यात सामील करून घेतली.

**इ) पेन्शन, पदव्या, तनखा रद्द:**

लॉर्ड डलहौसीने भारतीय संस्थानिकांच्या पेन्शन व पदव्या रद्द केल्या. यामध्ये प्रामुख्याने मोगल बादशहा बहादूरशहा जफर याची पेन्शन रद्द करून त्याची बादशहा ही पदवी काढून घेतली. दुसरा बाजीराव यांचे दत्तकपुत्र नानासाहेब यांची वार्षिक आठ लाख रुपयांची पेन्शन रद्द केली. त्यामुळे भारतीय संस्थानिकांमध्ये ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण झाला. 1857 चा उठाव घडून आला.

**ऊ) जहागीरदार व जमीनदार वर्गातील असंतोष:-**

ब्रिटिश कंपनीने इनाम कमिशन नेमून त्याद्वारे अनेकांच्या जहागिरी जप्त केल्या त्यामुळे जहागीरदार व वतनदार मंडळी लॉर्ड डलहौसीच्या या धोरणाच्या विरोधात असंतुष्ट झाली. ब्रिटिश कंपनीने जहागीरदार व वतनदार या अधिकाऱ्यांना पदच्युत करून त्यांच्या जागी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या त्यामुळे हा असंतुष्ट वर्ग इंग्रजांचा प्रमुख शत्रू बनला.

**2. प्रशासकीय कारणे:**

प्राचीन काळापासून भारतामध्ये राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांनी प्रशासनामध्ये स्थानिकांचा सहभाग घेतला होता. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी भारतात प्रशासन करीत असताना वांशिक भेदभाव करीत असे.

**अ) नोकऱ्यांमधील भेदभाव:**

ब्रिटिश कंपनीने हिंदी लोकांना अपात्र म्हणून व त्यांना कमी लेखून कमी वेतनाच्या नोकऱ्या दिल्या. पात्रता असूनही भारतीयांना ब्रिटिशांच्या तुलनेत समान काम करूनही कमी वेतन मिळत असे. तसेच अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या वेळीदेखील वांशिक भेदभाव केला जात असे. त्यामुळे भारतीयांच्या मनात ब्रिटिशांच्या विरोधी असंतोषाची भावना निर्माण झाली.

**ब) वतने व इनामाची समाप्ती:**

Dr. S. R. Katmani - History of Modern India

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील जहागीरदार वतनदारांकडे असलेली वतने जप्त केली. त्यांना मिळत असलेली इनामे नष्ट केली. त्यामुळे या वर्गांचे आर्थिक लाभ नष्ट झाले. त्यांच्या जमिनी व इतर हक्क गेल्याने ब्रिटिशांविरुद्ध  हा वर्ग असंतुष्ट झाला.

**क) प्रशासनातील इंग्रजी भाषेचे महत्त्व:**

मोगल कालखंडामध्ये भारतामध्ये फारसी ही दरबारी भाषा होती. परंतु ब्रिटिशांच्या आगमनाने इंग्रजी भाषेचे प्रशासनातील महत्त्व वाढले. इंग्रजी भाषा जाणणाऱ्या लोकांना प्रशासनातील नोकऱ्या देण्यात येऊ लागल्या. लॉर्ड हार्डिंग्जने सनदी नोकऱ्या देत असताना इंग्रजी भाषेला महत्त्व दिले. इंग्रजी भाषा भारतीयांना नवीन व अनभिज्ञ असल्याने ब्रिटिशांच्या विरोधी वातावरण निर्माण झाले.

**ड) आधुनिक शिक्षण व न्याय व्यवस्थेचा परिणाम:**

ब्रिटिश भारतात येण्याच्या पूर्वी भारतामध्ये धार्मिक शिक्षण दिले जाई. ब्रिटिशांच्या आगमनानंतर सर्वांना समान शिक्षण देण्याच्या भावनेतून विज्ञान-तंत्रज्ञान पाश्चात्य जगतात झालेले बदल क्रांत्या ह्या भारतीयांना शिक्षणाद्वारे यांचे ज्ञान भारतीयांना शिक्षणाद्वारे देण्यात येऊ लागले. तरीही प्रचलित शिक्षण पद्धतीत बदल केल्याने भारतीय लोक ब्रिटिशांच्या विरोधी बनू लागले. ब्रिटिशपूर्व काळात भारतामध्ये न्यायव्यवस्था एकसमान नव्हती. वेगवेगळ्या जातीतील व धर्मातील लोकांसाठी समान गुन्ह्यासाठी वेगवेगळी शिक्षा असायची. लॉर्ड मेकॉलेने 1833 पासून भारतीय कायद्याचे संहितीकरण करण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांनी कायद्यासमोर सर्वांना समान लेखले त्यामुळे भारतातील प्रतिगामी वर्ग ब्रिटिशांच्या विरोधी केला.

**3. आर्थिक कारणे:**

इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक शोषण केले. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 1757 ते 1857 या शंभर वर्षांच्या कालखंडामध्ये भारताला कच्चामाल पुरवठा करणारी एक वसाहत बनवली. तसेच इंग्लंडमध्ये तयार झालेला व्यापारी माल विकण्यासाठी म्हणून भारताकडे एक हमखास बाजारपेठ म्हणून पाहिले.

**अ) हस्तोद्योगांचा ऱ्हास:**

ब्रिटिशांनी भारतात यंत्र निर्मित व्यापारी वस्तू आणल्या. भारतीय हस्तोद्योग निर्मित उद्योगांना यांचा सामना करावा लागला. ब्रिटीशांच्या वस्तू तुलनेने स्वस्त व टिकाऊ असल्याने भारतीय मालाची मागणी संपुष्टात आली, परीणामी भारतातील उद्योग व लघु उद्योगांचा ऱ्हास सुरू झाला.

**ब) उद्योगधंद्यांचा ऱ्हास:**

ब्रिटिशांनी भारतीय उद्योगधंद्याच्या तुलनेत युरोपीय व इंग्लंडमधील उद्योजकांना सवलती दिल्या. भारतीय उद्योगधंद्यांवर विविध प्रकारचे जकात कर लादले. याउलट ब्रिटिश व युरोपियन उद्योगधंद्यांवरील निर्बंध कमी केले. त्यामुळे भारतीय उद्योगधंद्यांची पिछेहाट सुरू झाली व भारतीयांचा आर्थिक ऱ्हास मोठ्या प्रमाणावर झाला. ब्रिटीशांच्या भारतीय अनौद्योगीकरणाच्या धोरणामुळे भारतीय उद्योगधंद्यांची घसरण झाली.

**क) व्यापारातील पीछेहाट:**

ब्रिटिशांनी युरोपियन व इंग्लंडमधील व्यापाऱ्यांना विशेष सवलती दिल्या. यामध्ये करमुक्त व्यापार करण्यास परवानगीही दिली. याउलट भारतीय व्यापाऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या सवलती दिल्या नाहीत. परिणामी भारतीयांची व्यापाऱ्यांमध्ये पीछेहाट झाली.

**ड) कृषी व्यवस्थेतील पीछेहाट :**



Dr. S. R. Katmani - History of Modern India

प्राचीन काळापासून शेती हा भारतीयांचा प्रमुख व्यवसाय होता. ब्रिटिश काळातही शेती हाच भारतीयांच्या उत्पन्नाचा प्रमुख व्यवसाय होता. ब्रिटिशांनी कायमधारा, महालवारी, रयतवारी अशा वेगवेगळ्या जमीन महसूल पद्धतीचा अवलंब करून भारतीय शेतकऱ्यांकडून जादाचा शेतसारा सक्तीने व रोखीने वसूल केला. दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती व साथीच्या रोगांच्या वेळी शेतसाऱ्यामध्ये कोणत्याही प्रकारची सवलत दिली नाही. परिणामी भारतातील शेतकरी कर्जबाजारी बनला. भारतीय शेतकऱ्याला स्वतःच्या जमिनी सावकारांकडे व ब्रिटिश दलालांकडे गहाण ठेवाव्या लागल्या. आपल्याच जमिनीवर शेतमजूर म्हणून राबावे लागले. ब्रिटिशांनी भारतीय शेतीच्या उद्धारासाठी म्हणून कोणत्याही प्रकारच्या जलसिंचनाच्या सोयी केल्या नाहीत. दुष्काळ निवारणासाठीच्या सुविधा केल्या पण त्या अत्यल्प असल्याने भारतीय शेतकऱ्यांना त्याचा उपयोग झाला नाही. एकंदरितच ब्रिटिशांच्या शेती बद्दलच्या या धोरणामुळे भारतीय शेतीचे नुकसान झाले. 1857 च्या उठावाला ब्रिटिशांचे आर्थिक धोरण हे मोठ्या प्रमाणात कारणीभूत होते.

**4. धार्मिक कारणे:**

**अ) ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्याना विशेष सवलती:**

1856 च्या Religious Disability Act नुसार ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांना वडिलोपार्जित संपत्तीत त्यांचा हक्क मिळत असे. तसेच अनाथ बालकांना सेवा सुविधा देऊन ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली जाई. ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्याला नोकरीत सामावून घेतले जाई. जे नोकरीत असतील त्यांना बढती दिली जाई. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळांमधून ख्रिश्चन धर्माची शिकवण व तत्त्वज्ञान शिकवले जाई. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळांमधून ख्रिश्चन धर्माची शिकवण व तत्त्वज्ञान शिकवले जाई. तुरुंगवास भोगणाऱ्या भारतीयाने ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यास त्याची मुक्तता केली जात असे. या सर्व धार्मिक कारणांमुळे ब्रिटीशांविरुद्ध 1857 च्या उठावाची परिस्थिती निर्माण झाली असे म्हणावे लागेल.

**ब) मंदिरे व मशिदींची वतने काढली:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने अनेक हिंदू मंदिरांची व मुस्लीम मशिदींची वतने व इनामे काढून घेतली. यामुळे धर्मगुरु व मौलवींची अप्रतिष्ठा झाली. यामुळे धार्मिक असंतोष वाढीस लागला. याअगोदरच 1813 च्या चार्टर ॲक्टनुसार युरोपियनांना ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतामध्ये धर्मप्रसारासाठी परवानगी देण्यात आलेली होती. त्यामुळे ब्रिटिश भारतात भारतीयांचे धर्म बुडवण्यासाठी आले आहेत अशी भावना भारतीयांची बनली ज्याला 1857 च्या उठावाचे महत्त्वाचे कारण म्हणता येईल.

**क) हिंदू धर्मामध्ये ढवळाढवळ:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने प्रशासनाच्या व्यवस्थेसाठी म्हणून वैज्ञानिक शोधांचा वापर करून शैक्षणिक बदल केले. त्याचप्रमाणे भारतीयांना दळणवळणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. भारतीयांच्या धार्मिक चालीरीती व रूढी-परंपरांवर ब्रिटिशांनी बंधने लादण्यास सुरुवात केली. सतीबंदीचा कायदा पारित केला गेला त्यामुळे तथाकथित भारतीयांना ब्रिटिशांची ही बाब रुचली नाही. तसेच विधवा पुनर्विवाहाचा कायदा ब्रिटिशांनी पारित केला त्यामुळे रूढीवादी हिंदू वर्ग ब्रिटिश विरोधी बनला.

**5. सामाजिक कारणे:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 1757 ते 1857 अशा शंभर वर्षांच्या कालखंडामध्ये भारतीयांच्या सामाजिक चालीरीती व रूढी परंपरा व अंधश्रद्धा यावर टीका करून त्यामध्ये हस्तक्षेप केले.

**अ) भारतीयांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक:**

ब्रिटिशांनी भारतीयांना नेहमीच वर्णभेदाची अपमानास्पद वागणूक दिली. भारतीय लोक हे सुसंस्कृत, सुशिक्षित रानटी असल्याचा आरोप त्यांच्यावर ब्रिटिश नेहमी करत त्यांना गुलामाप्रमाणे वागणूक देत असत.

**ब) सामाजिक चालीरीती रूढी परंपरा मधील ब्रिटिशांचा हस्तक्षेप:**

Dr. S. R. Kattimani - History of Modern India

प्राचीन कालखंडापासून ते ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत भारतामध्ये विविध राजांच्या व घराण्यांच्या राजवटी होऊन गेल्या. यामध्ये विदेशी सुलतान व मोगल सम्राटांनी भारतावर राज्य केले. परंतु यापैकी कुणीही भारतीय लोकांच्या सामाजिक चालीरीती व रूढी-परंपरांच्या मध्ये हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे त्या राजांना भारतीयांकडून विरोध झालेला दिसून येत नाही.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय समाज जीवनामध्ये बदल करण्यासाठी म्हणून अनेक कायदे केले. कंपनी काळात भारतामध्ये सतीबंदीचा कायदा, विधवा पुनर्विवाह संमती कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा असे कायदे पारित करण्यात आले. भारतीयांच्या सामाजिक जीवनात ब्रिटिशांच्या हस्तक्षेपामुळे त्यांच्याबद्दल द्वेषाची भावना वाढीस लागली. याचे पर्यावसन 1857 च्या उठावामध्ये आपल्याला पाहायला मिळते.

**6. ब्रिटिश शिक्षण प्रणालीमुळे निर्माण झालेला असंतोष:**

1813 च्या सनदी कायद्याद्वारे भारतीयांसाठी कंपनीने प्रतिवर्षी एक लाख रुपये शिक्षणासाठी खर्च करावेत असे ठरवले गेले. यानुसार लोकशिक्षण समितीची स्थापना करण्यात आली. सर्वांना एक प्रकारचे शिक्षण ज्यामध्ये विज्ञान-तंत्रज्ञान, पाश्चात्य ज्ञान, नवे शोध या गोष्टींचा समावेश होता. हे सर्व प्रकारचे ज्ञान इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून दिले जाई. यामुळे संस्कृत भाषेची व भारतीय समाजाची पिछेहाट होत आहे ही भावना वाढीस लागून ब्रिटिश विरोधी वातावरण निर्माण झाले.

**7. लष्करी कारणे:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 1757 ते 1857 या कालावधीमध्ये जे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व लष्करी स्वरूपाचे बदल केले त्या सर्वांचा परिणाम 1857 च्या उठावाच्या व उद्रेकाच्या रुपाने जनतेने प्रकट केला. पी रॉबर्ट्स यांच्या मते, 1857 चा उठाव हा मूलतः लष्करी स्वरूपाचा होता. हिंदुस्थानात बराच राजकीय व सामाजिक असंतोष या काळात पसरला होता. 1857 च्या उठावाला शिपायांनी प्रथम सुरुवात केली. यानंतर अनेक लोक यामध्ये सामील झाल्याने या उठावाला देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले. याबाबत आर. सी. मुजुमदार लिहितात, If there were no Mutiny of Sepoys, there would have been no revolt.

**अ) हिंदी शिपायांना मिळणारी अन्यायी वागणूक:**

लष्करातील हिंदी शिपायांना अपमानास्पद व अन्यायी वागणूक दिली जात असे. परेड ग्राउंडवर त्यांना शिव्या दिल्या जात, प्रसंगी लाथाही मारल्या जात असत. हिंदी शिपायांवर समुद्र पर्यटनाची सक्ती केली जात असे. समुद्रपर्यटन केलेल्या शिपायांना समाजातून बहिष्कृत केले जाई, त्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधी शिपायांमध्ये असंतोष निर्माण झाला. लष्करातील उच्च अधिकाराची पदे फक्त ब्रिटिश अधिकाऱ्यांनाच दिली जात होती त्यामुळे हिंदी शिपायांची मने दुखावली गेली.

**ब) शिपायांवरील बंधने:**

ब्रिटिश पूर्व भारतामध्ये राजेरजवाडे यांचे व संस्थानिकांच्या पदरी सैन्य असायचे. या राजांकडून सैन्यास कोणत्याही प्रकारचे सामाजिक व धार्मिक बंधन नसायचे. विशेष करून कपाळावर गंध लावणे, लुंगी नेसणे, दाढी ठेवणे हिंदी शिपायांच्या या गोष्टींवर ब्रिटिशांनी निर्बंध लादले.

**क) पगार व बढतीतील अन्याय:**

हिंदी शिपायाने धर्मांतर केले व ख्रिश्चन धर्म स्वीकारला तर त्याला लष्करामध्ये बढती मिळत असे. एकाच स्तरावर काम करणाऱ्या हिंदी व युरोपियन सैनिकांच्या पगारात फारच तफावत होती हिंदी शिपायांना युरोपियनांच्या हमाल व मजूर यापेक्षाही कमी वेतन मिळत असे. भारतीय शिपायांना दरमहा सात रुपये इतका पगार होता. लष्करी मोहिमांमध्ये मात्र इंग्रज अधिकाऱ्यांच्या अगोदर हिंदी शिपायांची फौज आघाडीवर असायची, त्यामुळे अनेक हिंदी शिपाई युद्धामध्ये मारले जायचे. यामुळेही ब्रिटिशांविरुद्ध शिपायांमध्ये असंतोष निर्माण झाला होता.

Dr. S. R. Katimani - History of Modern India

**ड) बेकार संस्थानी सैन्यामधील असंतोष:**

कंपनीने सतराशे 1757 ते 1857 या काळात भारतातील बरेचशे संस्थान खालसा केली. अनेक संस्थानिकांना ब्रिटिशांनी तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले. या सर्व गोष्टींमुळे संस्थानातील मोठ्या प्रमाणावर सैन्य हे बेकार झाले. संस्थानी सैन्याच्या मनामध्ये ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण झाला जो 1857 च्या उठावाच्या रुपाने प्रकट झाला.

**ई) ब्रिटिश सैन्याची झालेली पीछेहाट:**

शिखांशी झालेली दोन युद्धे व अफगाण युद्ध यामध्ये ब्रिटिशांची पीछेहाट झाली होती. ब्रिटिशांना भारतामध्ये संस्थानाच्या विरोधी मिळालेले विजय हे हिंदी शिपायांमुळेच मिळालेले आहेत असा समज भारतीयांमध्ये निर्माण झाला होता. जे या 1857 च्या उठावास कारणीभूत ठरले असे म्हणता येईल.

**ऊ) भारतीय व युरोपियन सेनेच्या संख्यांमधील तफावत:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे एकूण सैन्य संख्या 2,33,000 इतकी होती. यापैकी गोऱ्या सैन्याची संख्या 45,000 इतकी होती व यातील ही 40000 सैन्य एकट्या पंजाबमध्येच बंडाळी निर्माण होण्याची शक्यता असल्याने ठेवले होते. भारतातील इतर प्रांतांमध्ये ब्रिटिश फौजेची संख्या कमी असल्याने अशावेळी ब्रिटिश सत्तेविरूद्ध युद्ध पुकारल्यास आपल्याला यश मिळेल अशी खात्री भारतीय सैन्यास वाटू लागली.

**8. तात्कालिक कारण:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने एनफिल्ड रायफल बंदुकीचा वापर नव्याने केला. ज्यासाठी चरबीयुक्त काडतूस वापरावे लागत. या काडतूसला गाय व डुकरांच्या चरबीचे आवरण होते. हे चरबीचे आवरण हिंदी शिपायांना दाताने काढावे लागायचे. गाय ही हिंदूना पवित्र असल्याने व डुक्कर हे मुस्लीम समाजामध्ये निषिद्ध मानले असल्याने हिंदी शिपायांच्या मनामध्ये ब्रिटिशांबद्दल असंतोषाची भावना निर्माण झाली. परिणामी बराकपूरच्या एकोणिसाव्या नेटिव इन्फंट्रीच्या शिपायांनी 26 फेब्रुवारी 1857 रोजी या काडतुसांना वापरण्यास नकार दिला. म्हणून ब्रिटिशांनी या इन्फंट्रीला (रेजिमेंट/ पलटण) बरखास्त केले.

बराकपूरच्या 34 व्या नेटिव्ह इन्फंट्रीच्या शिपाई मंगल पांडे यांनी 24 मार्च 1857 रोजी बंडाचा झेंडा उभारला. बराकपूरचे कमांडिंग ऑफिसर जनरल ह्युजन व त्याचे सहयोगी लेफ्टनंट बॉघ यांची गोळी झाडून हत्या केली. पुढे 8 एप्रिल 1857 रोजी मंगल पांडे यांना फाशी देण्यात आली. मेरठ येथील तिसऱ्या बटालियनच्या 85 शिपायांनी ब्रिटिशांचे आदेश मानण्यास नकार दिला त्यामुळे 24 मार्च 1857 रोजी यांचे कोर्ट मार्शल करून त्यांना कैद केले गेले. यानंतर लखनऊ व अवध येथील शिपायांनी ही चरबीयुक्त काडतुसांचा वापर करण्यास नकार दिला.

**उठावाचा घटनाक्रम:**

10 मे 1857 रोजी विद्रोही शिपायांनी आपल्या सोबतच्या बंदी असलेल्या शिपायांना तुरुंगातून सोडले व तेथील इंग्रज अधिकाऱ्याची हत्या केली व दिल्लीकडे कूच केली. यावेळी विद्रोही शिपायांनी मेरठच्या कमांडिंग ऑफिसर जनरल हेविट याचा पराभव केला. एकाच दिवसात म्हणजेच 11 मे ला हे सर्व सैनिक मेरठ येथे उठाव करून दिल्लीला पोहोचले व त्यांनी दिल्ली हे मुख्य केंद्र बनवले. हे सर्व सैनिक दिल्लीत गेल्यानंतर शेवटचा मुघल सम्राट बहादुरशहा जफर दुसरा याला या उठावाचे नेतृत्व करण्यास सांगितले. त्यावेळी बहादुरशहाचे वय हे 80 वर्षे इतके होते. 11 मे 1857 ला बहादुरशहाला दिल्लीचा बादशहा म्हणून घोषित करण्यात आले. बादशहा जरी बहादुरशहा असला तरी देखील सर्व कारभार हा त्यांचा सेनापती बख्तखान हाच बघत होता. उठाववाल्यांनी दिल्लीतील ब्रिटिश अधिकाऱ्यांची व युरोपियनांची सामूहिक हत्या केली गेली व ब्रिटिशांच्या शस्त्रागारावर हल्ला करून काबीज केले.

Dr. S. R. Katmani - History of Modern India

15 मे 1857 रोजी पुन्हा विल्यम हडसन याने ब्रिटिशांना दिल्लीवर ताबा मिळवून दिला. ब्रिटिशांनी याचा बदला हा बहादुरशहाचा नातू आणि 2 मुलांना काबुली दरवाजा म्हणजेच आजचा खुनी दरवाजा इथे ठार मारले. बहादुरशहा जफर यांना कैदेत ठेवले आणि त्यांना रंगून (ब्रम्हदेश) येथे पाठवले. तिथेच त्यांचा मृत्यू झाला. बख्तखान यांचा मृत्यू युध्दातच झाला.

पंजाबमधील काही भागांमध्ये 1857 च्या उठावाचा प्रसार झाला. परंतु पंजाब येथील मुख्य आयुक्त सर जॉन लॉरेन्स यांनी पंजाबमध्ये कायदा व सुव्यवस्था राखली. ज्यामुळे मथुरा, लखनऊ, बरेली, शहाजहानपूर, कानपूर, बनारस, झाशी, अलाहाबाद व उत्तर भारतातील अनेक ठिकाणी उठावाचा प्रसार झाला.

**लाल कमल व चपाती:**

स्वातंत्र्य युद्धाची योजना आखणाऱ्या नेतृत्त्वाचे व त्यांच्या कल्पकतेची प्रशंसा करावी तेवढी कमीच आहे. इंग्रजांना स्वातंत्र्ययुद्धाचा सुगावा लागू नये म्हणून उठाववाल्यांनी लाल कमळ व चपाती यास स्वातंत्र्य युद्धाचे प्रतीक बनविले व या प्रतीकांना गावागावातून व छावणी छावणीतून फिरवण्यात आले. उठावाची तारीख 31 मे, ही निश्चित करण्यात आली.

**उठावाचा प्रसार:**

1857 च्या उठावाची सुरुवात जरी चरबीयुक्त काडतुसाच्या प्रकरणाने शिपायांमधून झाली असली तरी अल्पावधीतच जनमानसामध्ये तिचा प्रसार झाला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारापासून ज्या लोकांना त्रास झाला होता ती सर्व लोक यामध्ये समाविष्ट झाले होते. भारतातील संस्थानिक, जहागीरदार, वतनदार, शेतकरी, व्यापारी, उद्योजक, धर्ममार्तंड तसेच संधीसाधू लोकांनीही ब्रिटिश विरोधी वातावरणाचा लाभ घेऊन उठावामध्ये समाविष्ट झाले.

**अ) दिल्ली:**

मीरतमधील सैनिकांनी आपल्या साथीदारांची कैदेतून सुटका केली. इंग्रजांविरुद्ध सशस्त्र युद्धाला सुरुवात झाली. सैनिकांनी इंग्रजांचा खजिना मिळवला व ते दिल्लीच्या रोखाने निघाले. 12 मे रोजी स्वातंत्र्यसैनिक दिल्लीला पोहोचले. तेव्हा दिल्लीमध्ये इंग्रजांचे सैन्य विशेष नव्हते. दिल्लीत असलेले एतद्देशीय सैनिक स्वातंत्र्यसैनिकांना म्हणजेच उठाववाल्यांना येऊन मिळाले. उठाववाल्यांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यात बहादुरशहा जफरला आपला बादशहा म्हणून घोषित केले. संपूर्ण दिल्ली मध्ये स्वातंत्र्य उत्सव साजरा करण्यात आला. दिल्ली इंग्रजांपासून स्वतंत्र झाल्याची घोषणा केली.

**ब) कानपूर:**

मीरत येथील शिपायांनी केलेले बंड, मंगल पांडे यांना दिलेली फाशी, उठाववाल्यांकडून राजधानी दिल्लीवरील कब्जा, या गोष्टींची माहिती कानपूर मधील शिपायांना झाली होती. 5 जून 1857 रोजी एका गोऱ्या शिपायाने हिंदी शिपायावर गोळीबार केला आणि त्यामुळे स्फोटक बनलेल्या परिस्थितीमध्ये कानपूर मधील शिपायांनी बंड पुकारले यानंतर ते दिल्लीकडे जाऊ लागले पण या लोकांना नेता नव्हता जो नानासाहेब पेशवा यांच्या रूपाने त्यांना मिळाला.

कानपुरमधील उठाव हा नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांनी कानपूरमधील बिठुर येथून केला. नानासाहेब पेशवे म्हणजे दुसऱ्या बाजीराव पेशव्याचे ते दत्तक पुत्र होते, त्यांचे नाव हे धोंडोपंत होते. तात्या टोपे म्हणजे पांडुरंग रामचंद्र टोपे, ज्यांना गनिमिकावा युद्ध पद्धतीच्या वापराबाबत लोकप्रिय व्यक्ती म्हणून ओळखले जाते. ब्रिटिशांनी नानासाहेबांना 8 लाखाचा तनखा, छोटीशी जाहगिरी व पदवी देण्यास नकार दिला. म्हणूनच ब्रिटिशांनी विरोधी नानासाहेबांच्या मनात असंतोष होता. परंतु ब्रिटिशांच्या प्रचंड सामर्थ्याची कल्पना असल्याने नानासाहेबांनी संधीची वाट पाहिली. नानासाहेबांनी दिल्लीकडे कूच न करता 1 जुलै 1857 रोजी स्वतः पेशवा बनल्याचा जाहीरनामा काढला. तसेच बहादुरशहा जफर यांना हिंदुस्तानचा बादशहा म्हणून घोषित केले.

Dr. S. R. Kattimani - History of Modern India

कानपूर येथील इंग्रजी लष्कराचा अधिकारी व्हयू व्हीलर हा होता. 27 जून 1857 रोजी नानासाहेबांच्या सैनिकांनी कानपूर येथे युरोपियन स्त्रिया व मुलांची हत्या केली. नानासाहेबांना लष्करी डावपेच फारसे माहिती नसल्यामुळे त्यांना लढ्याचे नेतृत्व प्रभावीपणे करता आले नाही. 17 जुलै रोजी मेजर जनरल हॅवलॉक यांनी नानासाहेबांना यांचा पराभव करून कानपुरवर ब्रिटिशांची सत्ता पुन्हा प्रस्थापित केली. तात्या टोपेंच्या नेतृत्वाखालील शिपायांनी ग्वाल्हेर येथे सुरुवातीस विजय मिळवले. ब्रिटिशांनी तात्या टोपेंचा पाठलाग सुरू केला. तात्याना कुठूनही मदत मिळत नव्हती. त्यामुळे ते नागपूर व नंतर बडोद्याला गेले. अनेक महिने इंग्रजी सैन्याबरोबर त्यांच्या चकमकी झाल्या. मानसिंग या नानासाहेबांच्या सैन्यातील एका व्यक्तीने इंग्रजांशी हातमिळवणी करून तात्या टोपेंना फितुरीने पकडण्यास मदत केली. तात्या टोपे यांना जनरल कॅम्पबेल याने पकडले. याच कॅम्पबेल याने पुढे हा बंड मोडून काढला. ब्रिटीशांनी तात्यांवर खटला चालवला. तात्या टोपे यांना शिवापूर येथे 18 एप्रिल 1859 रोजी फाशी देण्यात आली व नानासाहेबांनी नेपाळला पलायन केले.

**क) अवध:**

अवधची राजधानी लखनऊ येथे 30 मे रोजी सैनिकांनी युद्ध पुकारले, याला इतरही काही इंग्रज विरोधी लोकांनी मदत केली. अवधच्या उठावाचे नेतृत्व बेगम हजरतमहल व मौलवी-अहमदूल्ला हे करीत होते. बेगम हजरतमहल या नवाब वाजीद अली शहा यांच्या पत्नी होत्या. त्यांनी त्यांचा मुलगा बिर्जीस कादिर यास नवाब घोषित केले. बेगम हजरत महल या राणीला महाराजा बालकृष्णन आणि जियालाल या दोन हिंदू राजांनी मदत केली. या भागातील बरेचसे तालुकदार ही त्यांना येऊन मिळाले. सर्वत्र इंग्रजांविरुद्ध हल्ले होऊ लागल्याने रेसिडेंट हेन्री लॉरेंस यांनी भारतीय सैनिकांना विरोध करीत असताना त्याचा मृत्यू झाला. जनरल औट्रॅम यांच्यावर अवधची जबाबदारी सोपविण्यात आली. हॅवलॉक व कॅम्पबेलचे सैन्य त्याच्या मदतीला धावून आले. त्यामुळे इंग्रजांना अवधवर ताबा मिळवता आला. कॅम्पबेलने 21 मार्च 1858 रोजी अवधवर निर्णायक विजय प्रस्थापित केला. इंग्रजांनी अवधच्या जमीनदारांच्या जमीनी जप्त केल्या व बेगम हजरत महल यांनी नेपाळला पलायन केले.

**ड) बिहार:**

20 जुलै 1857 मध्ये बिहारमधील आरा येथील तुरुंगातील कैद्यांना मुक्त करून जगदिशपूरच्या उठावाला सुरुवात झाली. बिहारमधील जगदीशपुरचा जमीनदार कुवरसिंह यानी इंग्रजांविरुद्धच्या या लढ्याचे नेतृत्व केले. बिहारमधील दाणापूरच्या छावणीतील सैनिकानी युद्ध पुकारताच त्या प्रांतातील शेतकरीवर्ग व जमीनदार वर्ग एकत्र येऊन त्यांनी या लढ्यात सहभाग घेतला. त्या वेळी 80 वर्षाचे जमीनदार राणा कुवरसिंह यांनी हिंदी सैनिकांकडून हत्यारे काढून घेऊन ते कैद्यांमध्ये वाटले व पश्चिम बिहारवर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. इंग्रजांविरुद्ध लढा देताना सेनापती डग्लस याने केलेल्या हल्ल्यात कुंवरसिह जखमी झाले व त्यांचा मृत्यू झाला. बनारस व अलाहाबाद येथे झालेल्या उठावाला मोडून काढण्याचे काम कर्नल निल याने केले.

**इ) झाशीचा उठाव:**


झाशी म्हंटले की राणी लक्ष्मीबाई हे नाव समोर येते. त्यांचे खरे नाव हे मनिकर्णीका होते. तर त्यांच्या वडीलांचे नाव मोरोपंत तांबे आणि पतीचे नाव हे गंगाधरराव असे होते. 5 जून, 1857 रोजी झाशी येथे उठावाला प्रारंभ झाला. 1 वर्ष जवळपास राणीने लढा दिला, परंतु 5 एप्रिल 1858 ला ह्यू रोजने झाशीचा पाडाव केला. झाशीचा पाडाव झाल्यानंतर राणी लक्ष्मीबाई या काल्पी येथे जाऊन तात्या टोपे यांना मिळाल्या. शेवटी 17 जून 1858 ला वयाच्या 23 व्या वर्षी राणी लक्ष्मीबाई ग्वाल्हेर येथे धारातीर्थी पडल्या. त्यांचा पराक्रम पाहून सर ह्यू रोज म्हणतात की "Here lay the woman who was the only man among the rebels" बंगाली भाषेत राणी लक्ष्मीबाई यांच्या विषयी पुस्तक महाश्वेतादेवी यांनी 'झांसी की रानी' हे पुस्तक लिहिले आहे. सर ह्यू रोज राणी लक्ष्मीबाई बद्दल म्हणतो , " स्त्री असली तरी ती एक शूर व श्रेष्ठ लष्करी सेनानी होती."

**इतर ठिकाणचे उठाव /उठावाची व्याप्ती:**

Dr. S. R. Katmani History of Modern India

1857 चा उठाव हा ब्रिटिशांविरुद्ध भारतीयांचा शंभर वर्षाचा असंतोष होता. दिल्ली, अवध, झाशी, कानपूर, मीरत याबरोबरच उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, बंगाल, ओरिसा या प्रदेशात उठावाची व्याप्ती जास्त होती. हैदराबाद व मद्रास प्रांतातील वेल्लोर, राजपुतान्यातील मंदसौर, कोटा, धार याठिकाणी उठाव झाला, जो ब्रिटिशांनी चिरडून टाकला.

उत्तर भारताच्या तुलनेने दक्षिण भारतामध्ये 1857 च्या उठावाचा प्रसार कमी झाला. महाराष्ट्रात सातारा, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, सावंतवाडी, बेळगाव येथे तुरळक स्वरूपात उठाव झाले. 30 जुलै 1857 रोजी 27 व्या फलटण मधील रामजी शिरसाट यांच्या नेतृत्त्वाखाली हिंदी सैनिकांनी उठाव केला. कर्नाटकमधील कित्तुरमध्ये राणी चनाम्मा यांच्या नेतृत्वाखाली हा उठाव झाला.




**1857 च्या उठावाचे स्वरूप:**

1857 च्या उठावाच्या स्वरूपाबाबत इतिहासकारांमध्ये वेगवेगळे विचारप्रवाह आहेत. काहींनी या उठावाला सैनिकी बंड, राष्ट्रीय लढा तर काहीनी याला धर्मयुद्धाची झालर दिली आहे.

1. **जॉर्ज कॅम्पबेल:** हे निर्भेळ शिपायांचे बंड होते, ते सुद्धा बंगाल आर्मीतील हिंदू शिपायांचे बंड होते. कामगारांनी संप करावा त्यातीलच हा लष्करी प्रकार होय.

2. **न. र. फाटक:** 1857 चा उठाव म्हणजे शिपायाचे बंड किंवा शिपायांची भाऊगर्दी होय.

3. **डॉ.आर. सी. मुजुमदार**: 1857 चा उठाव ही राष्ट्रीय चळवळ मुळीच नव्हती. बंडाचे नेते हे राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले नव्हते.

4. **किशोरचंद्र मित्रा:** हे बंड मूलतः लष्करी बंडाच्या स्वरूपाचे आहे. 1 लाख शिपायांचे हे बंड आहे. जनतेच्या सहभागाचा त्याच्याशी संबंध नाही.

5. **सर जॉन सिली:** स्वार्थी आणि देशभक्ती नसलेल्या मूठभर शिपायांनी प्रस्थापित सरकार विरुद्ध केलेले ते बंड होते व त्यास लोकमताचा पाठिंबा नव्हता.

6. **सर जॉन लॉरेन्स:** बंडाचे मूळ लष्करातच होते. त्याचे मूळ कारण म्हणजे काडतूस प्रकरण होय, दुसरे काहीही नाही.

7. **डॉ. एस.एन. सेन:** 'धर्मयुद्ध म्हणून सुरुवात झालेल्या घटनेने शेवटी स्वातंत्र्य युद्धाचे स्वरूप धरण केले.'

8. **संतोषकुमार रे:** हा उठाव म्हणजे लष्करी अथवा सरंजामी उद्रेक अथवा धार्मिक उद्रेकातून निश्चितपणे अधिक काहीतरी होता.

9. **जेम्स औट्रॅयाम**: इंग्रजांची भारतातील शासनव्यवस्था नष्ट करण्याचा हिंदू आणि मुसलमान यांनी हा कट केला होता. राष्ट्रीय शासन प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छा होती असेही त्यांनी सूचित केले.

10. **अशोक मेहता:** 1857 चा उठाव म्हणजे राष्ट्रीय आंदोलन होय.

**1857 च्या उठावाच्या अपयशाची कारणे:**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 1757 ते 1857 या 100 वर्षाच्या काळात भारतात राज्य करत असताना आपल्या साम्राज्यवादी व वंशभेदी धोरणाने भारतातील शेतकरी, व्यापारी, कामगार, जमीनदार अशा सर्वच वर्गांचे शोषण केले. तसेच जमीनदारांची व संस्थानिकांची वतने खालसा केल्यामुळे व अनेक सत्ताधीशांना आपल्या सत्ता गमवाव्या लागल्यामुळे असंतुष्ट झालेल्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे कंपनी सरकारच्या विरोधात शस्त्र उचलले.

1857 च्या पूर्वी भारताच्या विविध भागातील असंतुष्ट लोकांनी कंपनीविरुद्ध उठाव केला ज्यामध्ये मध्य व पूर्व हिंदुस्थानातील आदिवासींचा उठाव, छोटा नागपूर भागातील कोलरी व मुंडा आदिवासींचा उठाव, उत्तर- पूर्व भागातील खासी टेकडयांवरील आदिवासींचा उठाव, नागा व कुकी बंडखोरांच्या उठाव, ओरिसातील खोंडा आदिवासी, बिहारमधील संथाळांचा उठाव व महाराष्ट्रातील खानदेशातील आदिवासींचे बंड यांचा समावेश होतो. या सर्व उठावांची व्याप्ती लहान व प्रादेशिक स्वरूपाचे असल्याने हे उठाव ब्रिटिश कंपनीने आपल्या शस्त्रसामर्थ्याने दडपून टाकले. परंतु 1857 चा उठाव हा या सर्वांपेक्षा व्यापक होता.

या उठावामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व प्रशासकीय धोरणाच्या विरोधात तीव्र असंतोष व्यक्त झाला. या उठावाला शिपायांचा विद्रोह, भारतीय बंड, महान बंड आणि भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध अशा अनेक नावांनी ओळखले जाते.

हिंदुस्थान ही ब्रिटीशांची सर्वात मोठी वसाहत असल्याने ईस्ट इंडिया कंपनी विरोधात निर्माण झालेले हे बंड मोडून काढण्यास ब्रिटिश पार्लमेंटने सर्वतोपरी प्रयत्न केले. ब्रिटिश साम्राज्याच्या अखत्यारीत असलेल्या सर्व वसाहतीमधून मदतीचा ओघ भारतीय वसाहत वाचवण्यासाठी झाल्याने ब्रिटीशांनी 1857 च्या उठावामध्ये विजय हस्तगत केला व भारतीयांचा पराभव झाला .

**1857 च्या उठावामध्ये भारतीयांच्या अपयशाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत:**

1. **संघटीत राष्ट्रवादाच्या भावनेचा अभाव:**

1857 च्या उठावावेळी उठाववाल्यांमध्ये राष्ट्रवादाच्या भावनेचा अभाव असणे हे एक अपयशाचे महत्त्वाचे कारण होते. फक्त 'फिरंगी' ईस्ट इंडिया कंपनीच्या द्वेषामुळे त्यांनी शिपायांना पाठिंबा दिला. आधुनिक राष्ट्रवाद भारतात अद्याप अज्ञात होता.

2. **उठाववाल्यांमध्ये समान उद्दीष्टांचा अभाव :**

Dr. S. P. Kathmani - History of Modern India

बंडखोरांमध्ये एकतेचा अभाव होता. बंगालचे शिपाई ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध बंड करत होते तर पंजाब आणि मुंबईच्या सैनिकांनी शिपायांविरुद्ध कंपनीला पाठिंबा दिला होता. तात्या टोपेंसारखे शिपाई आणि नेते मुघल राजवटीसाठी लढले तर पंजाबचे शीख मुस्लीम शासकांच्या अधीन परत जाऊ इच्छित नव्हते. अशा समस्यांनी मात्र बंडखोरांच्या गटातील सांघिक भावनेचे नुकसान झाले.

**3. उठावाचे मर्यादित क्षेत्र :**

उठाव बऱ्यापैकी व्यापक असला, तरी देशाचा एक मोठा भाग या उठावापासून दूर राहिला. बराकपूरच्या छावणीत निर्माण झालेला हा उठाव मेरठ, दिल्ली, अवध, कानपूर, बिहार, अलिगढ, कानपूर, बनारस, मथुरा, लखनौ, झाशी आणि इतर देशाच्या उत्तरेकडील भागांपुरते मर्यादित राहिले. 1857 च्या उठावाच्या क्षेत्रामध्ये मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बंगाल, बिहार, गुजरात यातील काही भागच सहभागी होता. महाराष्ट्रात कोल्हापूर, सावंतवाडी, सातारा, नरगुंद व नाशिक या भागात उठाव झाले. उत्तरेतही या बंडाला नेपाळ, काश्मीर, पंजाब, सिंध, म्हैसुर, मद्रास आणि राजपुतान्याने पाठिंबा दिला नाही. नर्मदा नदीच्या पलीकडील प्रदेश, पूर्व आणि दक्षिण भारत मोठ्या प्रमाणात अबाधित राहिले. थोडक्यात, 1857 चा उठाव हा देशातील 1/6 भूभागावरच झाला ज्यामध्ये 1/10 जनताच प्रत्यक्ष उठावामध्ये सहभागी झाली. त्यामुळे हा उठाव देशव्यापी होऊ शकला नाही म्हणून ब्रिटीशांना दडपता आला.

**4. सत्ताधारी संस्थानिकांचा ब्रिटीशांना पाठिंबा:**

1857 च्या उठावावेळी सत्ताधारी संस्थानिकांनी ब्रिटिशांना पाठींबा दिला व बंडाचे समर्थनही केले. ज्यामध्ये ग्वाल्हेरचे शिंदे, हैदराबादचा निजाम, नेपाळचा राणा जंग बहादूर, भोपाळची बेगम, काश्मीरचा राजा गुलाबसिंग डोगरा तसेच पतियाला, सिंध व कपूरथाळा येथील संस्थानिकांचा समावेश करता येईल.

**5. ब्रिटीशांजवळील अद्ययावत शस्त्रे :**

1857 च्या उठावामध्ये सहभाग घेतलेल्या उठाववाल्यांनी आपली पूर्ण शक्ती पणाला लावून ब्रिटीशांविरुद्ध लढले. परंतु यांच्याकडे परंपरागत पद्धतीची शस्त्रास्त्रे ज्यामध्ये तलवारी, भाले व अत्यंत मर्यादित बंदुका होत्या. याउलट ब्रिटीशांकडे मात्र एनफिल्ड रायफल सारख्या बंदुका, लांब पल्ल्याच्या तोफा, आधुनिक व प्रशिक्षित सैन्याच्या तुकड्यासहित सुसज्ज युद्धसामग्री असल्याने त्यांना भारतीय उठाववाल्यांवर अल्पावधीतच विजय प्राप्त करता आला.

**6. योग्य नेत्याचा अभाव :**

बंडखोरांकडे प्रभावी नेत्याचा अभाव होता. नानासाहेब, तात्या टोपे आणि राणी लक्ष्मीबाई हे शूर नेते असले तरी एकूणच चळवळीला प्रभावी नेतृत्त्व देऊ शकले नाहीत. उठाववाल्यांनी मुघल सम्राट बहादूर शाह जफर यांना त्यांचा नेता घोषित केले होते. 1857 च्या उठावावेळी मोघल बादशहा बहादूरशाह II हा 80 वर्षाचा एक वृद्ध आणि थकलेला माणूस होता. युद्धाच्या प्रसंगी लष्करी क्षमता आणि राजकीय कौशल्य असलेल्या नेत्याची गरज असते जो विखुरलेल्या घटकांना एकत्र करेल. त्यामुळे बहादुरशाह हा क्रांतिकारकांचे नेतृत्व करण्यास असक्षम होता. उठाववाल्यांकडे नानासाहेब पेशवे, रानी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवरसिंग व हजरतमहल यासारख्या नेत्यांचा समावेश होता परंतु यांचे नेतृत्त्व हे स्थानिक स्वरूपाचे होते. ज्यामुळे अखिल भारतीय स्तरावर सर्व उठाववाल्यांना एकमुखी योग्य नेतृत्व मिळाले नाही .

याउलट ब्रिटीशांकडे लॉर्ड कॅनिंग, एडवर्ड्स, लॉरेन्स, कॅम्पबेल, जॉन निकोल्सन, ह्यूम रोज, जेम्स आउटराम, हेन्री हॅवलॉक यांसारख्या अनुभवी व मुत्सदी लष्करी सेनापतींच्या नियोजन व समन्वयामुळे ब्रिटीशांचा या उठावात विजय झाला.

**7. समान ध्येयाचा अभाव :**

Dr. S. P. Kattimani - History of Modern India

1857 च्या उठावाच्या वेळी उठाववाल्यांमध्ये उठावामागे कोणतीही समान कल्पना किंवा ध्येय नव्हते. बंडाचे नेते परकीय राजवटीबद्दल द्वेषाच्या सामान्य भावनेने उठावात एकत्र सामील झाले होते. ब्रिटीशांच्या ताब्यातील बराचसा प्रदेश ताब्यात घेतल्यानंतर उठाववाल्यांकडे कोणतीही दूरदर्शी योजना नव्हती. प्रत्येकजण त्यांच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी उठावात सामील झाले होते. संस्थानिक त्यांचे राज्य व सत्ता गमावू नये यासाठी प्रयत्नशील होते. शिपायांना त्यांच्या कनिष्ठतेचे कारण होते व बहादुरशाहला मुघलांच्या वैभवाचे पुनरुज्जीवन करायचे होते. तसेच शेतकऱ्यांना जमीनदार आणि सावकारांना हटवायचे होते. एकूणच उठाववाल्यांतील समान उद्दीष्टांच्या अभावामुळे तसेच संवाद आणि समन्वयाचा कमालीचा अभाव असल्याने इंग्रजांना बंडाचा बिमोड करणे सोपे झाले.

**8. समाजातील सर्व वर्गांचा उठावामध्ये सहभाग नाही :**

1857 चा उठाव हा भारताच्या 1/6 भूभागावरच झाला ज्यामध्ये 1/10 जनताच प्रत्यक्ष उठावामध्ये सहभागी झाली होती. उठाववाले निष्क्रीय आणि उदासीन राहिलेल्या सामान्य लोकांना आकर्षित करू शकले नाहीत. अनेक ठिकाणी उठाव फक्त शिपायांपुरता मर्यादित होता. शिपाई आणि सामान्य लोकांच्यात जिव्हाळयाचा संबंध नव्हता. शिपायांमध्येही अनेकजण इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले. समाजातील सर्व वर्गाचा उठावात सहभाग नव्हता. मोठमोठे सावकार आणि व्यापाऱ्यांनी त्यांचे व्यक्तिगत हित ब्रिटिशांनी जपल्या कारणाने त्यांना उठावाच्या वेळी मदत देवू केली. आधुनिक सुशिक्षित वर्गाच्या दृष्टीने हे बंड मागासलेले होते त्यामुळे बंडाचे समर्थन ते करत नव्हते. सुशिक्षित भारतीयांना आशा होती की, ब्रिटिशांच्या आधुनिकीकरणामुळे एका नव्या युगाची सुरुवात होईल. त्यामुळेच सुशिक्षित मध्यमवर्ग, बंगालमधील श्रीमंत व्यापारी व जमीनदारांनी इंग्रजांना बंड दडपून टाकण्यास मदत केली. थोडक्यात, लोकसंख्येच्या एक दशांशपेक्षा जास्त लोक या उठावामध्ये प्रभावित झाले नाही. म्हणून हा उठाव देशव्यापी होऊ शकला नाही व ब्रिटीशांना यामध्ये विजय हस्तगत करता आला.

**9. उठावकाळातील ब्रिटीशांची परिस्थिती अनुकूल :**

1857 च्या भारतातील उठावकाळात ब्रिटिशांसाठी आंतरराष्ट्रीय परिस्थिती अनुकूल होती. 1856 पर्यंत क्रिमियन आणि चिनी युद्धे संपुष्टात आली होती, त्यामुळे ब्रिटिशांना उठावाचा बिमोड करण्यासाठी भारतात अतिरिक्त सैन्य जगभरातून पाठवता आले. जगभरातील इतर ब्रिटिश वसाहतीतील सैनिक, अत्याधुनिक संसाधने व शस्त्रास्त्रांचा वापर करून ब्रिटीशांना 1857 चा भारतातील उठाव दडपून टाकता आला.

**10. मर्यादित संसाधने :**

बंडखोरांकडे माणसे आणि पैसा या बाबतीत साधनसंपत्तीचा अभाव होता. मोगल सम्राट देखील व्यावहारिकदृष्ट्या निरुपयोगी होता, कारण दिल्लीच्या जमीनदारांकडून तो कर्ज मागत होता. भारतीय सैन्याची आर्थिक परिस्थिती देखील त्यांच्या पराभवाचे स्पष्ट कारण होते. याउलट इंग्रजांना भारतात माणसांचा, पैशाचा आणि शस्त्रास्त्रांचा सातत्याने पुरवठा होत असे. ब्रिटिश सैन्य श्रीमंत होते कारण भारतातील समृद्ध प्रदेश पूर्णपणे त्यांच्या नियंत्रणाखाली होते.

**11. दळणवळणाची साधने :**

1857 च्या उठावापुर्वीच ब्रिटीशांनी भारतात रेल्वे, तारयंत्र, टपाल सेवा इ. आधुनिक दळणवळणाच्या साधनांची निर्मिती केली होती. उठाववाल्यांनी युद्ध काळात रेल्वे-तारयंत्र यावर आपला ताबा मिळवला नाही किंवा ते विस्कळीत करू शकले नाहीत. याचा फायदा ब्रिटीशांना झाला. ब्रिटीशांना या दळणवळणाच्या साधनांद्वारे युद्धकालीन महत्त्वपूर्ण घटनांची माहिती- संदेशवहन व युद्धसामग्री ची ने-आण करणे शक्य झाले. ज्यांनी हे बंड दडपण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**12. इंग्रजांचा दहशतवाद व जहरी प्रचार :**

Dr. S. R. Kottimani History of Modern India

लॉर्ड कॅनिंगचे हा एक उत्कृष्ट सेनापती होता. त्याने समतोलपणाची भावना युद्धामध्ये कधीही गमावली नाही. लॉर्ड कॅनिंग आणि सर जॉन लॉरेन्स यांनी सुरुवातीच्या काळात निर्दयी आणि अविवेकी सूडाच्या धोरणाचा वापर करून युद्धाचा आक्रोश शांत करण्यासाठी प्रयत्न केला. 1857 चा भारतातील उठाव दडपून टाकण्यासाठी ब्रिटीशांनी गुन्हेगार व संशयितांवर अनन्वित अत्याचार केले. अनेकांच्या कत्तली केल्या, झाडाला उलटे टांगणे, मरेपर्यंत फटके मारणे व जिवंत जाळणे अशा अमानवीय शिक्षांच्या प्रकारामुळे ब्रिटीशांनी सामान्य नागरिकांच्या मनात दहशत निर्माण केली. जेणेकरून उठाववाल्यांना कोणत्याही प्रकारे सामन्यांकडून मदत मिळू नये यासाठी प्रयत्न केले.

बहादुरशाह व मोगल सत्तेची पुनर्स्थापना झाल्यास शीख संप्रदायाला अडचण होईल. नानासाहेब पेशव्यांकडे सत्ता आल्यास मुस्लीम सत्तेस धोका निर्माण होईल असा जहरी प्रचार ब्रिटीशांनी केला. अशाच प्रकारे भारतीय जनतेमध्ये क्रांतिकारकांच्या विरोधात प्रचार केला. उठाववाल्यांतील मौलवी रजब अली आणि मिर्झा इलाही बक्श यांसारख्या काही देशद्रोह्यांनी ब्रिटीशांना मदत केली. त्यामुळे ब्रिटीशांनी काहींना बक्षिसे व आमिषे देवून उठाववाल्यांच्या विरोधात काम करवून हा उठाव मोडून काढण्यात यश प्राप्त केले.

**13. इंग्रजांचे समुद्रावर वर्चस्व :**

ब्रिटीशांनी आपल्या नाविक सामर्थ्यामुळे जगभर वसाहती स्थापन केल्या होत्या. 1857 च्या उठावाप्रसंगी जगभरातील ब्रिटिश वसाहतीमध्ये शांतता असल्याने तेथील सैन्य व इतर सामग्री ब्रिटीशांनी नाविक सामर्थ्याच्या जोरावर समुद्रामार्गे भारतातील उठावांच्या ठिकाणी पोहोचवले. या ताज्या दमाच्या फौजांमूळे व अतिरिक्त रसद व मदतीच्या जोरावर ब्रिटीशांचा या युद्धात विजय झाला.

**मूल्यमापन:**

1857 चा उठाव हा वास्तवात ईस्ट इंडिया कंपनीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, लष्करी व प्रशासकीय गैरकारभाराप्रती भारतीय समाजाचा असंतोष होता. बहुसंख्य भारतीय नागरिकांनी परदेशी कंपनीच्या राजवटी विरूद्ध धैर्याने लढा दिला परंतु ब्रिटिश राज्याला उलथून टाकण्याच्या त्यांच्या धाडसी प्रयत्नात ते अपयशी ठरले.

उपरोक्त विविध कारणांनी या लढ्यामध्ये भारतीय उठाववाल्यांचा पराभव झाला व ब्रिटीशांना या युद्धात विजय प्राप्त झाला. परंतु 1857 च्या उठावाने भारतीय लोकांना एकत्र आणण्यात आणि त्यांना एका देशाचे असल्याची जाणीव करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**1857 च्या उठावाचे परिणाम:**

1857 चे बंड हे ब्रिटिश सरकारने त्यांच्या जवळ असणाऱ्या सैनिकी व नाविक सामर्थ्यामुळे, विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि बंडखोरांच्या कमतरतांमुळे दडपले होते. 1857 च्या उठावाने आधुनिक भारताच्या इतिहासाला एक महत्त्वपूर्ण वळण दिले. या उठावाचे अनेक चांगले व वाईट परिणाम भारतावर दीर्घकाळासाठी झाले. जरी ह्या उठावाने भारताला ब्रिटीशांच्या जोखडातून संपूर्णपणे मुक्त केले नाही. तरी हा उठाव काही व्यर्थ ठरला नाही. याचे अनेक दूरगामी परिणाम नजीकच्या काळात झाले. त्याचा भारतातील ब्रिटिश धोरणावर प्रचंड प्रभाव पडला.

**1857 च्या उठावाचे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील:**

**1. भारतातील सत्तेचे हस्तांतरण :**

1857 च्या उठावाचा पहिला सर्वात मोठा परिणाम म्हणजे या उठावाने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे भारतावरील राज्य संपुष्टात आले. म्हणजेच भारतातील राज्य करण्याच्या सत्तेचे हस्तांतरण होऊन राजकीय आणि प्रशासकीय सत्ता ईस्ट इंडिया कंपनीपासून ब्रिटिश पार्लमेंटकडे कायद्याद्वारे प्राप्त झाली. 1858 च्या कायद्यांतर्गत ब्रिटिशांचा राजा/राणी हेच भारतातील ब्रिटिश

Dr. S. P. Kattimani - History of Modern India

सत्तेची सर्वोच्च शक्ती असेल असे ठरवले गेले. भारताचे राज्य भारतमंत्र्याद्वारे म्हणजे सचिवांमार्फत केला जाईल व जो ब्रिटिश संसदेला जबाबदार राहील असे ठरले. भारतमंत्र्याला व्यवहारात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी; इंडिया कौन्सिल (भारतीय परिषद) ची स्थापना करण्यात आली. इंडिया कौन्सिलमध्ये पंधरा सदस्यांचा समावेश होता ज्यापैकी किमान नऊ जणांनी कमीत कमी दहा वर्षे भारतात सेवा केलेली असावी. इंडिया कौन्सिलचे अध्यक्ष भारतमंत्री असणार होते. भारतातील केंद्रीय प्रशासन गव्हर्नर जनरलच्या हातातच राहिले ज्यालाच व्हाइसरॉय हे नवीन नामाभिदान करण्यात आले.

**2. राणीचा जाहीरनामा :**

1 नोव्हेंबर 1858 रोजी लॉर्ड कॅनिंग याने अलाहाबाद येथे एक मोठा दरबार भरवून भारतातील अनेक संस्थानिक व राजपुत्रांना तसेच भारतातील लोकांना आमंत्रित करून त्यांच्यासमोर राणीचा जाहीरनामा वाचला. ज्याद्वारे ब्रिटनची राणी व्हिक्टोरियाला भारताची साम्राज्ञी अशी पदवी बहाल केली गेली. राणीचा जाहीरनामा लॉर्ड कॅनिंग याने वाचून दाखवताना त्यातून औदार्य आणि धार्मिक सहिष्णुता दिसून आली. कॅनिंगने भारतीयांना असे घोषित केले की, इंग्लंडमधील ब्रिटिश नागरिकांना जे व जसे अधिकार मिळत आहेत ते व तसेच अधिकार भारतीयांना ब्रिटिश राजवटीत मिळतील. तमाम भारतीयांना शिक्षण व नोकऱ्यांमधील समानता व समान कायदा अशा गोष्टींद्वारे समाजात समता प्रस्थापित केली जाईल. यामागील त्याचा उद्देश हा होता कि, ब्रिटिश प्रदेशातील तिच्या सर्व प्रजेने ब्रिटिश सरकारशी खरी निष्ठा ठेवावी .

ब्रिटिश सरकारच्या नवीन पद्धतीनुसार गव्हर्नर जनरलच्या पदाचे नामाभिधान व्हाईसरॉय असे करण्यात आले. त्यामुळे शेवटचे गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग हे भारतातील ब्रिटिश प्रदेशांचे पहिले व्हाईसरॉय बनले. लॉर्ड स्टेन्ले हे पहिले भारतमंत्री म्हणजेच भारताचे सचिव बनले.

राणीने तिच्या घोषणेमध्ये, स्थानिक राजपुत्रांना आश्वासन दिले की, इथून पुढे कोणतेही संस्थान खालसा केले जाणार नाही. कंपनी सरकारशी एकनिष्ठ असणाऱ्या सर्व संस्थानिकांना बक्षिसे दिली गेली. संस्थानिकांच्या राजपुत्रांना आश्वासन देण्यात आले की, त्यांच्या संबंधित राज्यांच्या प्रादेशिक अखंडतेचा आदर केला जाईल. ईस्ट इंडिया कंपनीने त्यांच्याशी केलेले सर्व करार कायम राखले जातील. त्यांना पुढे आश्वासन देण्यात आले की त्यांच्या हक्कांचा आणि सन्मानाचा आदर केला जाईल आणि ब्रिटिश सरकार त्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही.

**3. संस्थान विलीनिकरणाच्या धोरणाचा त्याग :**

राणीच्या जाहीरनाम्याद्वारे ब्रिटिश सरकारने भारतीय संस्थानिकांच्या अखंडतेची हमी दिली. भारतीय राजांच्या राजपुत्र दत्तक घेण्याच्या अधिकाराला मान्यता दिली गेली. कंपनीने संस्थानिकाशी केलेल्या सर्व करारांना राणीच्या जाहिरनाम्याद्वारे स्वीकृती देण्यात आली. ब्रिटिश साम्राज्यातील ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीय संस्थानांचे महत्त्व कळले आता त्यांना भारतातील ब्रिटिश राजवटीला संस्थानिकांकडून पाठिंबा हवा होता. म्हणूनच ब्रिटीशाना आता आणखी नवीन प्रदेश जोडण्याची इच्छा नव्हती. शिवाय, युरोपमधील क्रिमियन युद्धाच्या समाप्तीनंतरही ब्रिटिश सरकारला भारतावर रशियन आक्रमणाची भीती वाटत होती. अशा परिस्थितीत परदेशातून ब्रिटिश भारतास काही धोका निर्माण झाल्यास संस्थानिकांची मोठी मदत होईल असे वाटल्याने, ब्रिटिशांनी आपल्या अधिपत्याखालील खालसा केलेला भाग सोडून नवीन संस्थान विलीन करण्याचे धोरण सोडून देण्यात आले.

उठावकाळात जे संस्थानिक ब्रिटिशांशी एकनिष्ठ होते त्यांना स्वतंत्र केले गेले. तसेच काहींच्या शिक्षाना माफी देण्यात आली. भारतातील ब्रिटिश सरकार व भारतीय संस्थानिक यांच्यातील संबंध दृढ करण्यासाठी प्रयत्न केले गेले.

**4. धार्मिक बाबतीतील हस्तक्षेप टाळले :**

राणीच्या जाहीरनाम्याने भारतातील सर्व लोकांना धार्मिक स्वातंत्र्याची हमी दिली गेली. प्रत्येक भारतीयाला आपला धर्म पाळण्याची मुभा असेल. हिंदुच्या धार्मिक प्रथा, परंपरा आणि उपासनेमध्ये ब्रिटीशांकडून हस्तक्षेप केला जाणार नाही असे

Dr. P. Katinah History of Modern India

अभिवचन दिले गेले. प्रत्येकाला कायद्याचे समान आणि निष्पक्ष संरक्षण देण्याचे अभिवचन या जाहीरनाम्याद्वारे दिले गेले. अशा प्रकारे राणीच्या घोषणेनुसार, भारतातील सर्व लोकांना धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले आणि सरकारने कोणत्याही समुदायाच्या धार्मिक संवेदनशीलता आणि भावना दुखावणार नाही असे वचन दिले.

**5. शिक्षण व नोकऱ्यांतील समान संधी :**

राणीच्या जाहीरनाम्याद्वारे भारतीयांना असे आश्वासित करण्यात आले की, यापुढे ब्रिटनमधील नागरिकांना असणारे अधिकार भारतीयांना देखील दिले जातील. इथून पुढे सर्व भारतीयांना वंश भेद, पंथभेद व जातीभेद न करता सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी देण्याचे आश्वासन दिले जाईल. राणीच्या घोषणेने असे आश्वासन दिले की, सर्व भारतीयांसाठी समान कायदा तयार केला जाईल. कायद्यासमोर सर्वांना समान लेखले जाईल. भारतीयांसाठी कायद्याचे संहितीकरण करत असताना प्राचीन भारतीय रूढी, प्रथा व परंपरांचा योग्य तो आदर केला जाईल. ब्रिटिश सरकार भारतातील लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असेल. शेवटी, ब्रिटिशांविरुद्ध 1857 च्या उठावात भाग घेतलेल्या भारतीयांना माफीची घोषणा केली. सर्वांना कायद्याचे समान आणि निःपक्षपाती संरक्षण मिळेल अशी ग्वाही देण्यात आली.

**6. घटनात्मक विकासाची सुरुवात व इंडिया कौन्सिलची निर्मिती :**

भारतीयांच्या हितासाठी 2 ऑगस्ट, 1858 रोजी कायदा करून इंडिया कौन्सिलची निर्मिती करण्यात आली. ज्याद्वारे भारतातील प्रशासकीय स्वरुपाची कामे करण्यासाठी सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्याद्वारे राज्यकारभार चालवला जाईल असे घोषित केले. या अधिकाऱ्याचा वेतन व इतर खर्च हे भारताच्या महसूल उत्पन्नातून केले जाणार होते. भारताच्या सचिवाला इंडिया कौन्सिलद्वारे साहाय्य केले जाणार होते ज्यामध्ये पंधरा सदस्यांचा (संचालकांचा) समावेश होता, त्यापैकी आठ जणांना ब्रिटनच्या राणीद्वारे नियुक्त केले जाणार होते आणि उर्वरित सात संचालक न्यायालयाद्वारे निवडले जाणार होते. यातील प्रत्येक सदस्याला एक हजार दोनशे पौंड वार्षिक वेतन भारताच्या महसुलातून द्यायचे ठरले. 1906 पर्यंत भारतीय परिषदेचे म्हणजेच इंडिया कौन्सिलचे सर्व सदस्य युरोपियन होते. 1907 मध्ये, दोन भारतीयांची नियुक्ती इंडिया कौन्सिलमध्ये करण्यात आली.

भारताच्या मंत्र्याला भारताच्या राज्यकारभाराच्या मार्गदर्शनासाठी काही नियम आणि कायदे तयार करण्याचा अधिकार होता. इंडिया कौन्सिलला राज्याच्या नागरी आणि लष्करी सेवकांना नियुक्त करण्याचा आणि नियंत्रण ठेवण्याचा अधिकार होता. 1858 ची राणीची घोषणा ही भारताच्या घटनात्मक इतिहासातील एक महत्वाची ऐतिहासिक बाब मानली जाते. ज्याद्वारे ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीचा शेवट आणि भारतावर थेट ब्रिटिश राजवट प्रस्थापित झाली जी भारतासाठी एका नव्या युगाची नांदी होती.

7. **लष्करी बदल** :

1857 च्या उठावाचे प्रमुख कारण हे लष्करी असल्याने ब्रिटिशांनी सैन्य व लष्कर व्यवस्थेत बरेचसे आमूलाग्र बदल केले. डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात, बंडाचा अनुभव आणि इंग्रज सैन्याच्या अनास्थेमुळे सैन्याच्या पुनर्रचनेचा प्रश्न समोर आला. दोन महत्त्वाचे बदल झाले. एक इंग्रज आणि भारतीय सैन्य यांच्यातील प्रमाणाशी संबंधित आणि दुसरे सैन्याच्या भविष्यातील संघटनेशी संबंधित. ब्रिटिशांच्या भारतीय सैन्याबद्दलच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला. ब्रिटिश सैन्याचे प्रमाण 1:2 असे ठेवण्यात आले. 1857 च्या उठावानंतर भारतीय सैन्यात युरोपियनांची संख्या वाढवून ती 45322 वरून 65000 इतकी केली. तसेच हिंदी शिपायांची संख्या 2,33,000 वरून कमी करून 1,40,000 वर आणली गेली. लष्करातील सर्व महत्त्वाची पदे ब्रिटिश अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात आली. ब्रिटिशांचा वेगवेगळ्या ठिकाणी ठेवल्या गेलेल्या लष्करातील रसद, शस्त्रसाठा व तोफखान्याच्या प्रमुखपदी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

पंजाब, नेपाळ आणि वायव्य सरहद्द प्रांतातील सेनेने निकडीच्यावेळी ब्रिटीशांविषयी आपली निष्ठा सिद्ध केली होती. त्यामुळे 1857 च्या उठावानंतर ब्रिटिशांनी शीख पलटण, गुरखा पलटण, मराठा पलटण असे जातीय व पंथीय पलटणी उभारल्या.

Dr. S. R. Kattimani - History of Modern India

यामुळे हिंदी लोकातील ऐक्य संपुष्टात आले. तसेच पुढील काळात शीख, गुरखा, मराठे, गडवाली यासारख्या शूर व प्रामाणिक लोकांना ब्रिटिशांनी सैन्यात प्राधान्य दिले. तसेच बंगाली व पूरभैय्या यासारख्या जमातींना सैन्यातून पूर्णपणे काढून टाकले. 1857 च्या उठावाचा महत्त्वाचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी लष्करी खर्चामध्ये वाढ केली. यानंतर 1857 सारखा उठाव पुन्हा होऊ नये याची दक्षता घेतली.

### 8. सामाजिक परिणाम:

ब्रिटिशांनी भारतीयांच्या सती प्रथा, बालविवाह, गुलामगिरी यासारख्या सामाजिक रूढी, रीतीरिवाज व परंपरामध्ये हस्तक्षेप केल्यामुळे भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक भावनांना ठेच पोहोचली होती. 1857 च्या उठावाच्या प्रमुख कारणांमध्ये हे एक महत्त्वाचे कारण होते. 1857 च्या उठावाने ब्रिटीशांना भारताच्या पारंपारिक सामाजिक-धार्मिक रीतिरिवाजांमध्ये हस्तक्षेप करण्याची व्यर्थता पटवून दिली. यामुळे पुढील काळात ब्रिटिशांनी भारतीयांच्या सामाजिक जीवनात व प्रथा परंपरा मध्ये हस्तक्षेप करण्याचे टाळले. 1857 च्या उठावानंतर ब्रिटीशांनी पाश्चिमात्य कल्पना आणि सुधारणा आणण्यापेक्षा पारंपारिक आशियाई समाजात एक सुदृढ आणि कार्यक्षम प्रशासन देण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. ब्रिटीशांनी केलेल्या सामाजिक कायद्यांना हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही समाजातील सनातनी घटकांकडून तीव्र विरोध झाल्याने सामाजिक सुधारणांद्वारे भारताचे जलद पाश्चात्यिकरण करण्याच्या ब्रिटीशांच्या योजनांना तडा गेला. ब्रिटिशांनी अवलंबलेल्या या प्रतिगामी धोरणामुळे भारतामध्ये सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक कायदे पास होण्यासाठी अनेक वर्ष थांबावे लागले.

### 9. राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण:

ब्रिटिशांनी भारतामध्ये रेल्वे, तारायंत्र व पोस्ट ऑफिस यांसारख्या सुविधा निर्माण केल्या. ज्यांच्या वापराने भारतीय लोकांमध्ये संवाद व जवळिकता निर्माण होण्यास मदत झाली. पाश्चात्य ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञानाचा अभ्यास करून राष्ट्रप्रेमाने भारावलेली मध्यमवर्गीय तरुण पिढी तयार झाली. ज्यांच्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही व राष्ट्र प्रेमाच्या भावना व जाणिवा निर्माण झाल्या.1857 च्या उठावाचा बिमोड करण्यासाठी उठाव झाल्यानंतरही ब्रिटिशांनी सर्वसामान्य लोकांवर अनन्वित अत्याचार करून त्यांच्यामध्ये दहशत निर्माण केली. ज्यामुळे ब्रिटिश हे परकीय असल्याची व संघटित राष्ट्रवादाची भावना, राष्ट्रीय ऐक्याची भावना भारतीय समाजात निर्माण होण्यास मदत झाली.

### 10. ब्रिटिशांकडून फोडा व झोडा नीतीचा अवलंब:

1857 च्या उठावामध्ये भारतातील हिंदू व मुस्लिम समाजाने मोठ्या ऐक्याने ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष केला. या गोष्टीचे महत्त्व लक्षात घेऊन ब्रिटिशांनी पुढील काळात फोडा व झोडा या नीतीचा अवलंब करून भारतामध्ये संप्रदायवादाच्या निर्मितीला पोषक परिस्थिती निर्माण केली. 1857 च्या उठावानंतर, ब्रिटिशांनी आपले भारतावरील साम्राज्य दीर्घकाळ निर्विवादपणे चालावे म्हणून भारतीयांना विभागण्यासाठी या नीतीचा अवलंब केला. यामुळे भारतातील विविध जाती आणि वर्गांमध्ये जातीय तेढ निर्माण झाली. इंग्रजांनी एका वर्गाचा किंवा जातीचा दुसऱ्या वर्गाविरुद्ध वापर केला. मुस्लिमांना हिंदूंशी लढायला आणि उच्चवर्णीय हिंदूंना बहुजन हिंदूंविरुद्ध लढण्यासाठी उत्तेजित केले होते. म्हणून पुढील काळात मुस्लिम लीग, हिंदू महासभा यांच्या निर्मितीला खतपाणी घालून भारताची फाळणीकडे वाटचाल झाली.

### 11. मोगल घराण्याचा शेवट:

चुगताई तुर्क घराण्यातील जहीरुद्दीन मोहम्मद बाबर याने पानिपतच्या पहिल्या लढाईत इब्राहीमखान लोदीचा पराभव करून मोगल घराण्याची सत्ता भारतावर प्रस्थापित केली. 1707 मध्ये शेवटचा प्रबळ मोगल सम्राट औरंगजेबच्या मृत्यूने मोगल सत्ता खिळखिळी बनली व ती कशीबशी 1857 पर्यंत टिकून होती. परंतु 1857 च्या उठावामध्ये बंड करून उठलेल्या शिपायांनी व उठाववाल्यांनी मोगल बादशहा बहादुरशहा याला आपला नेता म्हणून निवडले. या उठावामध्ये भारतीयांच्या अपयशानंतर

ब्रिटिशांनी मोगल बादशहाला हद्दपार व जन्मठेपेची शिक्षा देऊन ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात ठेवले. येथे कैदेतच 7 नोव्हेंबर 1862 रोजी बहादूरशहाचा मृत्यू झाला व या बरोबरच मोगल सत्तेचा अंत झाला.

**12. जीवित व वित्त हानी:**

1857 च्या उठावामध्ये बऱ्याच लहान मोठ्या संस्थानिकांनी, लष्करातील सेनेनी सहभाग घेतला होता. या युद्धामध्ये ब्रिटीशांचा विजय झाला व अनेक भारतीय उठाववाल्यांचा मृत्यू झाला. तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, कुंवर सिंह व मौलवी अहमदूल्लाह यासारख्या प्राणपणाला लावून लढलेल्या भारतीय सेनानींचा मृत्यू झाला.

ब्रिटिश सेनेचेही मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्त नुकसान झाले. 1857 च्या उठावामध्ये विजय प्राप्त करण्यासाठी ब्रिटिशांनी आपली सर्व सत्ता व शक्ती पणाला लावली. यावेळी ब्रिटिशांना खूप मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले असल्याने ब्रिटिशांनी पुढील काळात ही आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी भारतीयांवर वेगवेगळे कर बसवले व भारतीयांचे आर्थिक शोषण केले.

**13. नव्या युगाची नांदी:**

1857 च्या उठावाने भारतीय बुद्धिजीवींना स्वातंत्र्याच्या लढ्यात हिंसेची निरर्थकता पटवून दिली. तसेच 1857 च्या उठावाने एका जुन्या बुरसटलेल्या व कालबाह्य झालेल्या युगाची समाप्ती होऊन नव्या आधुनिक युगाचा प्रारंभ झाला. ब्रिटिशांनी प्रादेशिक विस्ताराऐवजी भारतीयांच्या आर्थिक शोषणावर जास्तीचा भर दिला. 1857 च्या उठावापूर्वी भारतीय संस्थानिक व राजांकडे समाजाचे नेतृत्व होते ज्याची जागा आता मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणांनी प्रशासनात शिरकाव करून घेतली. एका अर्थाने भारताने पुरोगामी व आधुनिक युगात प्रवेश केला असे म्हणावे लागेल.

**ऐतिहासिक मूल्यमापन :**

1857 चा उठाव ही आधुनिक भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम करणारी एक महत्त्वपूर्ण घटना होती. सर लेपल ग्रिफिन यांच्या म्हणण्यानुसार 1857 मध्ये विद्रोह झाला नसता, तर ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय यंत्रणा आणि धोरणांमधील विविध प्रकारचे दोष आणि अनियमितता जगासमोर आली नसती. 1857 च्या महान उठावामुळे लंडनमधील ब्रिटिश सरकारचे लक्ष ताबडतोब वेधले आणि त्यांनी प्रशासनातील विविध दोष आणि उणीवा दूर केल्या. 1857 च्या उठावाच्या प्रमुख व तात्कालिक कारणामध्ये भारतीय शिपायांच्या खऱ्या तक्रारी होत्या हे नाकारता येत नाही. उठाववाले व बंडखोर सैनिक हे नक्कीच त्यांच्या न्याय्य व हक्कांसाठी लढ्यात सहभागी झाले होते. परंतू ब्रिटीशांच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीने, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे व प्रशिक्षित सैनिकी सामर्थ्याने उठावामध्ये ब्रिटीशांच्या विजयाचा मार्ग मोकळा केला.

थोडक्यात, 1857 च्या उठावामुळे ईस्ट इंडिया कंपनीचा अंत झाला. नामधारी असलेल्या मोगल बादशहाचे पद रद्द करण्यात आले, तसेच संस्थानिकांचे राज्यांचे विलिनीकरण संपुष्टात आले, दत्तकांना मान्यता मिळाली, इंग्रजांबद्दल भारतीयांचा द्वेष वाढला. एकूणच 1857 च्या उठावामुळे पुढील काळात ब्रिटीशांनी आपल्या साम्राज्यवादी धोरणात बदल करून सुयोग्य प्रशासनाद्वारे भारतीयांचा विश्वास जिंकण्याचे प्रयत्न सुरु केले.

**1857 च्या उठावाचे महत्त्व:**

19 व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटीशांची भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनात सर्वोच्चता असल्याचा होती. 1857 च्या उठावाने या गोष्टीला छेद दिला. 1857 च्या उठावाला केवळ शिपायांची बंडखोरी मानणे म्हणजे त्यास कारणीभूत ठरणाऱ्या मूळ व महत्त्वाच्या कारणांना कमी लेखणे होय. बहुतेक भारतीय इतिहासकार आणि विद्वानांनी 1857 च्या विद्रोहाला पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाप्रमाणे संबोधले होते. डॉ. के. एम. पन्नीकर यांनी 1857 च्या उठावाला 'राष्ट्रीय क्रांती' म्हटले आहे. वि. दा. सावरकर आणि अशोक मेहता यांनी उठावाला 'स्वातंत्र्ययुद्ध' असे म्हटले आहे. जयचंद विद्यालंकार आणि

Dr. S.P. Katinmani - History of Modern India

पंडित नेहरू यांनी 1857 चे बंड हे 'पहिले स्वातंत्र्ययुद्ध' म्हणून स्वीकारले. इंग्लंडच्या कंझर्व्हेटिव्ह (पुराणमतवादी) पक्षाचे समकालीन नेते व नंतरचे पंतप्रधान बेंजामिन डिजरायली यांनी 1857 च्या उठावाला 'राष्ट्रीय विद्रोह' म्हटले आहे. त्यांच्या मते, हे बंड हे कोणत्याही तात्कालिक कारणाचे परिणाम नव्हते. हा एक जाणीवपूर्वक आणि संघटित योजनेचा परिणाम होता असे म्हणता येईल.

1857 चा उठाव हा भारतीयांच्या जीवनावर दूरगामी परिणाम करणारा होता. यामध्ये भारतातील संस्थानिक व सैनिकांबरोबरच सर्वसामान्य जनतेचाही काही प्रमाणात समावेश होता. 1757 ते 1857 या शंभर वर्षाच्या कालावधीत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर राज्य करताना केलेल्या अन्याय व अत्याचाराबद्दल असलेला असंतोष भारतीयांनी 1857 च्या उठावाद्वारे व्यक्त केला होता. जरी या उठावाद्वारे भारताला ब्रिटिशांच्या तावडीतून पूर्णपणे मुक्तता मिळाली नसली तरी ह्या उठावाचे महत्त्व कमी होत नाही. कारण या उठावामुळे भारतीयांच्या मनामध्ये राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकता व स्वातंत्र्याची आस निर्माण करण्याची भावना निर्माण केली.

1857 च्या उठावाच्या काळातच मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथे विद्यापीठांची स्थापना झाली. तसेच ब्रिटीशांनी भारतीय दंड संहितेची निर्मिती केली. ज्याद्वारे कायद्याचे राज्य निर्माण करण्यास मदत झाली. म्हणूनच पुढील काळात संघटितरीत्या आपल्या मागण्या ब्रिटिश सरकारपुढे मांडण्यासाठी देशपातळीवरील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना भारतीयांनी केली. एकूणच 1857 चा उठाव हा एक महान क्रांतिकारी उठाव होता. ज्यामुळे शंभर वर्षाहून अधिक काळ राज्य करणाऱ्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा अस्त होऊन भारतामध्ये नव्या युगाची पहाट झाली.

| **प्रश्न 1 . रिकाम्या जागा भरा.** | | | | **अचूक उत्तर** |
|---|---|---|---|---|
| 1. 1844 झाली प्रशासनात नोकरी देतेवेळी स्पर्धा परीक्षा घेऊन त्यात इंग्रजी भाषेला महत्त्व दिले जाईल असे______________या गव्हर्नर जनरलने जाहीर केले. | | | | |
| अ) लॉर्ड कॉर्नवॉलीस | ब) लॉर्ड वेलस्ली | क) लॉर्ड हार्डिंग्ज | ड) लॉर्ड विल्यम बेंटीक | क |
| 2. 25000 इनामे व जहागीरिंची चौकशी करून ती जप्त करण्याचे काम करणारे इनाम कमिशन कोणी नेमले? | | | | |
| अ) रॉबर्ट क्लाइव्ह | ब) वॉरन हेस्टींग्ज | क) लॉर्ड कर्जन | ड) लॉर्ड डलहौसी | ड |
| 3. 1829 मध्ये लॉर्ड विल्यम बेटिंग यांच्या पुढाकाराने______________या भारतीय समाजसुधारकाने सतीबंदीसाठी चे प्रयत्न केले. | | | | |
| अ) छत्रपती शाहू महाराज | ब) राजा राममोहन राय | क) पंडिता रमाबाई | ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ब |
| 4. 1848 साली लॉर्ड डलहौसी यांनी सातारा संस्थान ____________ या कारणासाठी खालसा केले. | | | | |
| अ) दत्तक वारस नामंजूर | ब) आर्थिक अडचण | क) तैनाती फौजेचा स्वीकार | ड) दरबारातील अंतर्गत गोंधळ | अ |
| 5. कंपनीच्या कारभारावर इंग्लंडच्या पार्लमेंटचे नियंत्रण प्रस्थापित करणारा कायदा______________म्हणून ओळखला जातो. | | | | |
| अ) पार्लमेंट ॲक्ट | ब) कंपनी ॲक्ट | क) रेग्युलेटिंग एक्ट | ड) चार्टर ॲक्ट | क |
| 6. भारतातील पहिला रेल्वे मार्ग______________हा होय. | | | | |
| अ) ठाणे ते बोरीबंदर | ब) लाहोर ते दिल्ली | क) हैदराबाद ते तिरुपती | ड) दिल्ली ते कलकत्ता | अ |
| 7. महाराष्ट्रामध्ये रयतवारी पद्धत ______________यांनी सुरू केली. | | | | |
| अ) लॉर्ड कर्झन | ब) लॉर्ड एल्फिन्स्टन | क) लॉर्ड कॉर्नवालीस | ड) लॉर्ड विल्यम बेंटींक | ब |
| 8. देशी भाषेतील पहिले वर्तमानपत्र कोणते होते? | | | | |
| अ) बॉम्बे हेरॉल्ड | ब) इंदुप्रकाश | क) मुंबई समाचार | ड) समाचार दर्पण | क |
| 9. कायमधारा जमीन महसूल पद्धती कोणी सुरू केली? | | | | |
| अ) लॉर्ड लिनलिथगो | ब) लॉर्ड कॉर्नवॉलीस | क) रॅम्से मॅकडोनाल्ड | ड) लॉर्ड विल्यम बेंटिक | ब |
| 10. ______________ हा दिवस उठावासाठीचा निश्चित करण्यात आला. | | | | |
| अ) 31 मे, 1858 | ब) 31 एप्रिल, 1856 | क) 23 जून, 1857 | ड) 31 मे 1857 | ड |
| 11. 1857 चा उठावाच्या वेळी क्रांतीचे प्रतीक काय होते? | | | | |
| अ) हातोडा व कुऱ्हाड | ब) लाल कमळ व चपाती | क) मशाल | ड) ढाल व तलवार | ब |
| 12. बराकपूरच्या 34 व्या रेजिमेंट मधील______________ हा 1857 च्या उठावातील पहिला हुतात्मा ठरला. | | | | |
| अ) तात्या टोपे | ब) कुवरसिंह | क) मंगल पांडे | ड) नानासाहेब पेशवे | क |
| 13. 1857 च्या उठावावेळी कोल्हापूरच्या उठावाचे नेतृत्व कोणी केले? | | | | |

Dr. S. R. Kathmani - History of Modern India

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) तात्या टोपे | ब) छत्रपती शाहू महाराज | क) रामजी शिरसाठ | ड) श्रीहरी पटवर्धन | क |
| 14. 1857 च्या उठावावेळी इंग्रजांचा गव्हर्नर जनरल कोण होता? | | | | |
| अ) लॉर्ड वेलस्ली | ब) लॉर्ड डफरीन | क) कर्नल जेम्स | ड) लॉर्ड कॅनिंग | ड |
| 15. 1857 च्या उठावावेळी अवध येथील लढ्याचे नेतृत्व कोणी केले? | | | | |
| अ) कुवरसिंह | ब) बेगम हजरत महल | क) अब्दुल कादिर बदायुनी | ड) बहादुरशहा जफर | ब |
| 16. झाशीची राणी लक्ष्मीबाई हिचा पराभव कोणत्या ब्रिटिश अधिकाऱ्याने केला? | | | | |
| अ) कर्नल नील | ब) सर जॉन लॉरेन्स | क) सर ह्यू रोज | ड) मेजर हडसन | क |
| 17. 1857 च्या उठावाला शिपायांची भाऊगर्दी असे कोण संबोधतात? | | | | |
| अ) डॉ. आर. सी. मुजुमदार | ब) स्वातंत्र्यवीर सावरकर | क) प्रा. न. र .फाटक | ड) किशोरचंद्र मित्रा | क |
| 18. 1857 चे ' स्वातंत्र्य समर' हे ग्रंथ कोणी लिहले? | | | | |
| अ) किशोरचंद्र मित्रा | ब) आर. सी. मजुमदार | क) पंडित जवाहरलाल नेहरू | ड) स्वातंत्र्यवीर सावरकर | ड |
| 19. ______________हा मुघल वंशातील शेवटचा बादशहा होय. | | | | |
| अ) रफि-उ-दर्जत | ब) बहादुरशहा | क) आजमशहा | ड) औरंगजेब | ब |
| 20. लॉर्ड कॅनिंग ने राणीचा जाहीरनामा ______________येथे प्रसिद्ध केला . | | | | |
| अ) लखनऊ | ब) दिल्ली | क) अलाहाबाद | ड) अलिगड | क |
| 21. इंग्रजांविरुद्ध खासी उठावाचे नेतृत्व ______________यांनी केले. | | | | |
| अ) सुरेंद्र साई | ब) टीटू मीर | क) बिरसा मुंडा | ड) तितर सिंह | ड |
| 22. नानासाहेब पेशव्यांचा मंत्री किंवा प्रमुख सल्लागार ______________हा होता. | | | | |
| अ) वाजीद अलिशाह | ब) अजीमउल्लाह खान | क) मौलवी अहमदशाह | ड) अमिरुल्लाह खान | ब |
| 23. बिहारमध्ये 1857 च्या बंडाचा मुख्य संघटन कर्ता ______________हा होय. | | | | |
| अ) खान बहादूर खान | ब) मौलवी अहमददुल्ला | क) कुंवरसिंह | ड) रायसाहाब | अ |
| 24. पागलपंथी संप्रदायाची स्थापना ______________यांनी केली . | | | | |
| अ) सय्यद अहमद | ब) हाजी शरियतउल्ला | क) करमशहा | ड) शहा वली उल्लाह | क |

**प्रश्न 2 . खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

1. 1857 च्या उठावाच्या विविध कारणांची सविस्तर चर्चा करा
2. 1857 च्या उठावाच्या अपयशाची कारणे स्पष्ट करा.
3. 1857 च्या उठावांच्या परिणामांची थोडक्यात माहिती लिहा.
4. 1857 च्या उठावाचे स्वरूप स्पष्ट करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा**

1. झाशीची राणी लक्ष्मीबाई
2. काडतूस प्रकरण
3. राणीचा जाहीरनामा
4. 1857 च्या उठावाचे महत्त्व
5. 1857 च्या उठावाची सामाजिक कारणे
6. 1857 च्या उठावाची राजकीय कारणे
7. 1857 च्या उठावाची आर्थिक कारणे
8. लॉर्ड डलहौसीचे संस्थान खालसा धोरण
9. 1857 च्या उठावाची लष्करी कारणे

Dr. S. P. Kattimani History of Modern India